**अधीक्षक अभियंता व सहसंचालक**
**महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी**
**जलसंपदा विभाग, दिंडोरी मार्ग, नाशिक - ४२२ ००४**

**संपर्क:- व्या. परीक्षा -०२५३-२५३ २८७९** ई-मेल :- pemetansk@gmail.com

**जा.क्र.** मअप्रप्र/व्या.परीक्षा/(नस्ती क्र.-०३/२०२४)/ ९४ /२०२४ दि. २६/०८/२०२४

# परिपत्रक

**विषय:-** सहाय्यक अभियंता श्रेणी २/ सहाय्यक अभियंता (राजपत्रित) स्थापत्य/ यांत्रिकी/ विद्युत) व कनिष्ठ अभियंता (अराजपत्रित) (स्थापत्य/ यांत्रिकी/ विद्युत) गट ब संवर्गाकरीता माहे ऑगस्ट २०२४ मधील नियोजीत ऑनलाईन व्यावसायिक परीक्षा.
**(परीक्षेचे सुधारीत वेळापत्रक जाहिर करणेबाबत)**

**संदर्भ:-** या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. ७५ दि. ३१/०७/२०२४

संदर्भिय परिपत्रकान्वये, सहाय्यक अभियंता श्रेणी २/ सहाय्यक अभियंता (राजपत्रित) स्थापत्य/ यांत्रिकी/ विद्युत) व कनिष्ठ अभियंता (अराजपत्रित) (स्थापत्य/ यांत्रिकी/ विद्युत) गट ब संवर्गाची व्यावसायीक परीक्षा दि. ३०/०८/२०२४ व ३१/०८/२०२४ रोजी घेण्याचे प्रस्तावीत होते.

परंतु परीक्षार्थीच्या संख्येत अनपेक्षितपणे दुपटीपेक्षा जास्त वाढ झाल्याने उपरोक्त परीक्षा सदर तारखेस घेणे शक्य होणार नाही असे TCS संस्थेमार्फत कळविण्यात आलेले आहे.

तरी, सुधारीत वेळापत्रकानुसार **सदरची परीक्षा आता दि. ०२/०९/२०२४ (सोमवार) व ०३/०९/२०२४ (मंगळवार) रोजी घेण्यात येणार आहे.**

सदर परीक्षा ही महाराष्ट्रातील **अहमदनगर, अकोला, अमरावती, नाशिक, नागपूर, पुणे, सातारा, सांगली, ठाणे, छत्रपती संभाजी नगर** या केंद्रावर घेण्यात येणार आहे. तथापी, परीक्षा आयोजन सुरळीत पार पाडण्याच्या दृष्टीने अंतीम परीक्षा केंद्र हे परीक्षार्थीच्या प्रवेश पत्रावर (Hall Ticket) दिल्याप्रमाणे असेल.

सदर व्यावसायीक परीक्षेचे सुधारीत वेळापत्रक खालील प्रमाणे आहे.

| वार / दिनांक | कालावधी | विषय | परीक्षा पद्धत |
|---|---|---|---|
| (सोमवार) ०२/०९/२०२४ | ९.०० ते १०.३० | सामान्य अभियांत्रिकी (स्थापत्य / यांत्रिकी / विद्युत) | ऑनलाईन |
| | १२.३० ते २.०० | वैकल्पिक विषय (स्थापत्य / यांत्रिकी / विद्युत) | ऑनलाईन |
| (मंगळवार) ०३/०९/२०२४ | ९.०० ते १०.०० | लेखा व प्रशासन नियम (स्थापत्य / यांत्रिकी / विद्युत) | ऑनलाईन |
| | १२.०० ते १.०० | आरेखन (स्थापत्य / विद्युत) | ऑनलाईन |
| | १.१५ ते २.१५ | सर्वेक्षण (स्थापत्य / यांत्रिकी) | ऑनलाईन |

**टिप:** १) परीक्षार्थीची प्रत्येक पेपर सुरु होण्याआधी परीक्षा केंद्रावर TCS मार्फत ऑनलाईन नोंदणी करण्यात येते. तरी परीक्षार्थीची मोठी संख्या विचारात घेता परीक्षार्थीनी प्रत्येक पेपर सुरु होण्याच्या एक तास आधी परीक्षा केंद्रावर हजर असणे आवश्यक आहे.

२) परीक्षार्थीच्या सोईसाठी या कार्यालयामार्फत परीक्षेसंबंधी अद्ययावत माहिती देणे व मार्गदर्शन करणेसाठी X (Twitter) वर "@pemetansk" हे अकाऊंट तयार करण्यात आलेले आहे. तरी सर्व परीक्षार्थीनी या अकाऊंटला फॉलो करावे.

**(प्र. मो. बावीस्कर)**
अधीक्षक अभियंता व सहसंचालक
महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी,
नाशिक

D:\Old Pc\Professional Exam\JE Exam March 2024\Extension.doc